**राज्य रोजगार हमी योजना/**

**<u>महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना –</u>**

**(वैयक्तिक लाभार्थी योजना)**

**<u>''जवाहर विहिर कार्यक्रम''</u>**

**सुधारित मापदंड .........**

**महाराष्ट्र शासन,**

**नियोजन विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : रोहयो–२००७/प्र.१७९/रोहयो–१.**

**मंत्रालय, मुंबई–४०० ०३२**

**दिनांक : १० एप्रिल, २००८**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक : जविका१२९८/प्र.१०४/रोहयो–१०, दि. १ जुलै, १९९९

२) शासन निर्णय क्रमांक : जविका–२०००/प्र.६/रोहयो–१०, दि. २४ ऑगस्ट, २०००

३) शासन निर्णय क्रमांक : जविका–२०००/प्र.४८/रोहयो–१०, दि. १ ऑक्टोबर, २००१

४) शासन निर्णय क्रमांक : जविका–२००२/प्र.६८/रोहयो–१०, दि. २४ मे, २००२

५) शासन निर्णय क्रमांक : जविका–२००३/प्र.९६/रोहयो–१०, दि. ऑक्टोबर, २००४

**<u>प्रस्तावना :</u>**

रोजगार हमी योजनेअंतर्गत **''जवाहर विहिर''** हा कार्यक्रम १९८८ मध्ये सुरु करण्यात आला व डिसेंबर, १९९१ मध्ये या कामाची व्याप्ती वाढवून राज्यात आता सर्व जिल्ह्यांत **''जवाहर विहिर कार्यक्रम''** राबविण्यात येत आहे. राज्यात या कार्यक्रमांअंतर्गत शेतकऱ्यांना विहिरीसाठी नियोजन विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १ ऑक्टोबर, २००१ नुसार निश्चित केलेल्या मापदंडानुसार सध्या अनुदान दिले जाते.

२. अलिकडच्या काळातील विहिरींच्या साहित्य सामग्री खर्चातील वाढ तसेच दिनांक १४ मार्च, २००७ पासून मजुरीच्या दरातील वाढ, इत्यादी बाबी लक्षात घेऊन विहिरींच्या आर्थिक मापदंडात सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

शासन असे आदेश देत आहे की, राज्य शासनाच्या रोजगार हमी योजने अंतर्गतच्या **''जवाहर विहिर''** कार्यक्रमाखाली घ्यावयाच्या विहिरींच्या किंमतीचे मापदंड पुढीलप्रमाणे लागू करण्यांत येत आहेत :–

| अ. क्र. | भूस्तराचा प्रकार | जिल्हे | प्रति विहिर दर |
|---|---|---|---|
| १. | वालुकामय व मेटामार्फीक (रुपांतरीत) विदर्भातील भाग आणि तापी पूर्णा खोऱ्यातील भाग | गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, अकोला, अमरावती, बुलढाणा, धुळे, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी. | रु. १,००,०००/- |
| २. | दख्खन पठाराचा प्रदेश | नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, नंदूरबार, जळगाव, उस्मानाबाद, औरंगाबाद, लातूर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड | रु. १,००,०००/- |
| ३. | जांभ्या खडकाचा प्रदेश (किनारपट्टीचा भाग) | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग. | रु. ७०,०००/- |

२. एका जिल्ह्यात दोन/तीन प्रकारचे भूस्तर असल्याने काही जिल्ह्यांची नांवे वरील विवरणात दोन / तीन ठिकाणी आलेली आहेत. वरील जिल्ह्यांतील भूस्तराचे गट हे भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणेत जिल्ह्यातील भूस्तर प्रकारानुसार पाडलेले आहेत.यासंबंधी काही शंका उपस्थित झाल्यास या विषयी भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

३. उपरोक्त विहिरीचे मापदंड शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १० एप्रिल, २००८ पासून लागू राहतील. दिनांक १ एप्रिल, २००८ पासून प्रशासकीय मान्यता देण्यात येणाऱ्या नवीन विहिरींना हे आर्थिक मापदंड लागू राहतील.

४. वरील विवरणपत्रात विहिरींच्या आर्थिक किंमतीचे जे मापदंड दिलेले आहेत ते कमाल आहेत. प्रत्यक्षात विहिर बांधण्यास जर कमी खर्च येत असेल तर विहिरींचे अंदाजपत्रक त्या खर्चापर्यंत सिमित ठेवावे.

५. या विहिरी बांधण्यासाठी अकुशल व कुशल खर्चाचे प्रमाण ५०:५० राहील.

६. प्रत्यक्षात विहिरीचे काम चालू झाल्यानंतर सदरहू विहिर विशिष्ट प्रकारच्या भौगोलिक भूस्तरामुळे किंवा अन्य कारणामुळे विहित मापदंडात बसू शकत नसेल तर या सुधारित किंमतीच्या २० टक्के पर्यंत होणाऱ्या जादा खर्चाचे सुधारित अंदाजपत्रकांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, व २० टक्के पेक्षा अधिक खर्चाच्या सुधारित अंदाजपत्रकास विभागीय आयुक्तांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. मात्र अशा सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देताना जिल्ह्यांत उद्दीष्टानुसार मंजूर केलेल्या विहिरींवर होणारा सरासरी खर्च विहित निकषात बसेल याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

७. जवाहर विहिरी योजनेवरील खर्च नियोजन विभाग, मागणी क्रमांक ओ-३, मुख्य लेखाशिर्ष २५०५, ग्रामीण रोजगार-६०-इतर कार्यक्रम, ००१ रोजगार हमी योजना-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनातंर्गत योजना (०१)(०१) रोजगार हमी योजना, (०१)(०२) जवाहर विहिर कार्यक्रम, (२५०५०७६४) (योजनांतर्गत / दत्तमत) ३१ सहाय्यक अनुदाने या उपलेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सिआर १४०/व्यय-८, दिनांक १०.४.२००८ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अशोक जाधव)
मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)